'सह आयुक्त' या पदाची दि.१/१/२०१७ रोजीची
प्राथमिक सेवाजेष्ठतासूची प्रसिध्दीबाबत.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११०१८.
क्र.प्रशा/१२/कावि/ १०१७ /२०१८
दिनांक : 23 / १० /२०१८

वाचले क्र.१) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. एसआरव्ही-२०११/प्र.क्र.२८४/१२, मंत्रालय, मुंबई ४०००३२ दिनांक २१/१०/२०११
२) अधिकार प्रदान आदेश क्र. प्रशा/१/कावि/११७५/२०१३ दि. २९/८/२०१३
३) मा.आयुक्त सो. यांचेकडील परिपत्रक क्र.प्रशा/७/कावि/६५/१२ दि. १९/१/२०१२
४) मा.आयुक्त सो. यांचेकडील परिपत्रक क्र.प्रशा/७/कावि/६३५/१३ दि. ३१/५/२०१३
५) प्रशासन विभागाकडील दि. १७ / १० /२०१८ चा मान्य प्रस्ताव

<u>आदेश</u>

महाराष्ट्र नागरी सेवा (जेष्ठतेचे विनियमन) नियम १९८२ दि.२१ जुन १९८२ मधील तरतुदींच्या अनुषंगाने तसेच सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.एसआरव्ही-२०११/प्र.क्र.२८४/१२, मंत्रालय, मुंबई ४०००३२, दि.२१/१०/२०११ अन्वये शासन मंजूर असलेल्या पदाच्या सेवाजेष्ठता तयार करण्यात येतात. पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवरील सह आयुक्त अभिनामाच्या दि.१५/११/२०११ अन्वये शासन मंजूर असलेल्या पदावर पदोन्नतीने आदेश क्र. प्रशासन/१/कावि/७६४/ २०१४ दि.८/१२/२०१४ अन्वये श्री.गावडे दिलीप काशिनाथ यांची नियुक्ती करणेत आलेली आहे. तसेच आदेश क्र. प्रशा/१/कावि/०१/२०१६ दि.१५/२/२०१६ अन्वये सह आयुक्त पदावर श्री.गावडे दिलीप काशिनाथ हे नियमित वेतनश्रेणीत नेमणुक देणेत आलेली आहे. त्यामुळे सह आयुक्त पदाची दि.१/१/२०१७ रोजीची प्राथमिक सेवाज्येष्ठता सुची प्रसिध्द करुन अधिकाऱ्यांनी स्वत:चे नावाबाबत, जात, प्रवर्ग, जन्मतारीख, शैक्षणिक अर्हता, रुजू तारीख अथवा सुचीमध्ये नाव नसलेबाबत हरकती मागविणेस हरकत वाटत नाही.

१) प्राथमिक सेवाजेष्ठतासूचीमधील नमुद अधिकाऱ्यांनी स्वत:चे नावाबाबत, जात, प्रवर्ग, जन्मतारीख, शैक्षणिक अर्हता, रुजू तारीख, जेष्ठता क्रम, नियुक्तीचा मार्ग, सेवानिवृत्ती दिनांक अथवा जेष्ठतासूचीमध्ये नांव नसलेबाबत काही आक्षेप असल्यास त्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांनी आपला आक्षेप लेखी निवेदन सादर करून ही तात्पुरती अतिरिक्त प्राथमिक जेष्ठतासूची प्रसिध्द झाल्यापासुन प्रशासन विभागाकडे **३० दिवसाचे** आत संबंधित शाखाप्रमुखांमार्फत योग्य त्या पुराव्यासह सादर करावा.

२) आक्षेप मुदतीत सादर न केल्यास किंवा आक्षेपासोबत योग्य ते पुरावे सादर न केल्यास अशा अपुर्ण आक्षेपांचा विचार केला जाणार नाही.

३) सर्व शाखाप्रमुखांना कळविण्यात येते की, ही प्राथमिक सेवाजेष्ठतासूची त्यांनी त्यांच्या विभागातील सर्व संबंधित अधिकाऱ्यांना तात्काळ बजावुन त्यांना प्रत मिळालेबाबत दिनांकीत स्वाक्षांकित **पोहोच ८ दिवसाचे** आत प्रशासन विभागास सादर करावी. तसेच त्यांनी सदर जेष्ठतासूची त्यांच्या कार्यालयाच्या सुचना फलकावर प्रसिध्द करावी.

४) संबंधित अधिकाऱ्यांनी सादर केलेले आक्षेप शाखाप्रमुखांनी स्वयंस्पष्ट शिफारसीसह / अभिप्रायासह व कर्मचाऱ्यांनी सादर केलेल्या पुराव्यांची खातरजमा करूनच आवश्यकता असलेस सेवानोंद पुस्तकातील नोंदीसह सर्व पुरावे सत्यप्रती करून मुदतीत प्रशासन विभागाकडे सादर करावे.

५) प्राथमिक सेवाजेष्ठतासूची प्राप्तच झाली नाही किंवा मुदतीत आक्षेप सादर करूनही शाखाप्रमुखांनी मुदतीत आक्षेप प्रशासन विभागाकडे सादर न केल्यास अंतिम सेवाजेष्ठतासूची प्रसिध्दीनंतर काही वाद निर्माण झाल्यास उक्त संदर्भ क्र.४ अन्वये याबाबतची संपुर्ण जबाबदारी शाखाप्रमुखांची राहील.

६) या प्राथमिक सेवाजेष्ठतासूचीत काही वास्तविक चुका असल्यास उदा. नाव समाविष्ठ नसणे, आडनावात/आद्याक्षरात/जन्मतारखेत चुका आढळुन आल्यास त्या शाखाप्रमुखांनी निदर्शनास आणाव्यात, म्हणजे जेष्ठतासूची अंतिम करताना त्या दुरूस्त करण्यात येतील.

७) ही प्राथमिक सेवाजेष्ठतासूची मे.न्यायालयात दाखल केलेल्या अन्य कोणताही विशेष निर्वाणी अर्ज / याचिकेवरील निर्णयामुळे पुर्वीची अथवा या जेष्ठतासुचीत बदल करावा लागेल, त्या निर्णयाच्या अधिन राहुन असेल.

सही/-
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११०१८.

प्रतः- संबंधित विभाग

२/- सदर आदेश व सेवाजेष्ठतासूचीं मनपाच्या www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आली असून सदरची प्रत संबंधित अधिकाऱ्यांचे निदर्शनास आणुन द्यावी. प्राथमिक सेवाजेष्ठतासूची संबंधित अधिकाऱ्यांना तात्काळ बजावुन त्यांना प्रत मिळालेबाबत दिनांकीत स्वाक्षांकित **पोहोच ८ दिवसाचे** आत प्रशासन विभागास सादर करावी. प्राथमिक सेवाजेष्ठतासूची प्राप्तच झाली नाही किंवा मुदतीत आक्षेप सादर करूनही शाखाप्रमुखांनी मुदतीत आक्षेप प्रशासन विभागाकडे सादर न केल्यास अंतिम सेवाजेष्ठतासूची प्रसिध्दीनंतर काही वाद निर्माण झाल्यास उक्त संदर्भ क्र.४ अन्वये याबाबतची संपुर्ण जबाबदारी शाखाप्रमुखांची राहील.

प्रशासन अधिकारी, (२)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -४११०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी 411 018

सह आयुक्त पदाची दि.01/01/2017 रोजीची प्राथमिक सेवाज्येष्ठतासूची प्रसिध्दीबाबत

वेतनश्रेणी :- 15,600-39,100 ग्रेड वेतन :- 6900

| अ.क्र | संगणक क्र. | अधिकाऱ्याचे नाव | जात | प्रवर्ग | शैक्षणिक पात्रता | जन्म दिनांक | सह आयुक्त पदावर रुजु तारीख | नियुक्तीचा मार्ग (पदोन्नत/ सरळसेवा/ मर्यादीत विभागीय परिक्षा) | मनपामध्ये कामास लागलेचे | | सेवानिवृत्ती दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | पद | तारीख | | |
| 1 | 4161 | गावडे दिलीप काशिनाथ | मराठा | खुला | एम.ए. (समाजशास्त्र), आरोग्य निरिक्षक कोर्स, कामगार कल्याण मधील पदविका पास, डिप्लोमा इन इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी (सी-डॅक), संगणक पदविका उत्तीर्ण, एल.जी.एस., डी.एल.जी.एफ.एम. | 01/06/1961 | 08/12/2014 | पदोन्नती | को-ऑर्डीनेटर | 17/02/1984 | 31/05/2019 | |

प्रशासन अधिकारी (2)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी 411 018.

सही/-
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी 411 018.